

# वासनांध समलैंगिकाकडून युवकाची निर्घृण हत्या

## अल्पवयीनाला दगडाने ठेचले ■ अवघ्या काही तासात आरोपीला अटक



**महासागर प्रतिनिधी**

**मोर्शी,( दि.24 )** - शहरातील एका 17 वर्षीय तरुणाची निर्घृण हत्या झाल्याची घटना शुक्रवारी (दि.24) उघडकीस आली. सकाळी 7 वाजताचे सुमारास मोर्शी ते अमरावती मार्गावरील येरला गावाजवळ असलेल्या शिरभाते मंगल कार्यालयाजवळ या या युवकाचा विवस्त्र अवस्थेत रक्ताने माखलेला मृतदेह आढळून आला. पोलिसांनी तपास सुत्र हलविल्यावर ही हत्या एका वासनांध समलैंगीकाने केल्याचे पुढे आले. जबरदस्तीने अनैसर्गिक अत्याचार करण्याचा विरोध केल्याने या तरुणाची हत्या या वासनांध मारेकऱ्याने केल्याचे समोर आले.

दिनेश उर्फ मोलु भद्दु उईके (वय 26 वर्ष रा. पोडगव्हान ता.मोर्शी) असे अटक मारेकऱ्याचे नाव आहे. मोर्शी शहरातील श्रीकृष्ण पेठ येथे मृतक तरुण आपल्या कुटूंबासह भाड्याने राहतो. गुरुवारी (दि.23) मृतक संध्याकाळी 9.30 वाजताच्या सुमारास एक फोन आला म्हणून घराबाहेर पडला. यावेळी त्याने आपल्या वडीलांना सिंभोरा चौकातून येतो, असे सांगून गेला. मात्र तो रात्री घरी परत आलाच नाही. त्यामूळे मृतक तरुणाच्या आई-वडीलांनी पोलीस स्टेशनमध्ये धाव घेत, मुलगा घरी परत आला नसल्याची तक्रार नोंदविली. शुक्रवार (दि.24) सकाळी 7 वाजता येरला गावाजवळील असलेल्या गौरक्षण नजीक शेताच्या काटेरी कुंपणात या तरुणाचा मृतदेह नग्न अवस्थेत आढळून आला. मृतदेह ज्या बाजूला आढळून आला त्या शेतात त्याच्या चपला व उजव्या बाजूला पॅन्ट व एक थैली आढळून आली होती. मृतक हा पेट्रोल पंपावर पेट्रोल भरण्याचे, हॉटेल बार, दारूचे दुकानावर काम करीत असल्याचे बोलल्या जात आहे. आरोपी नाम दिनेश उर्फ गोलु उईके हा घटनेचे दिवशी दि.23 जानेवारी रोजी सांयकाळी अदांजे 9.30 वा. चे दरम्यान मोर्शी येथे दारु पिण्याकरीता आला. त्याची नजर मृतकावर पडली. मारेकऱ्याने त्याने भुलथापा देवुन मोर्शी येथील शिरभाते मंगल कार्यालय जवळील शेतशिवारात घेवून गेला. दरम्यानचे काळात त्याने मृतकाचा मोबाईल फोनसुध्दा जवळ घेवून घेतला. मृतकाचे आरोपीस वारंवार मोबाईलची मागणी करीत होता. परंतु आरोपीने त्यास त्याचा मोबाईल परत न करता मृतक यास अनैसर्गिक शरीर सुखाची मागणी केली. त्यावर मृतक याने नकार दिल्याने आरोपीने मृतकाच्या डोक्यावर मोठ्या दगडाने मारुन जखमी केले.

### मुर्च्छित अवस्थेत केला संभोग

मृतक हा मुर्च्छित अवस्थेत असताना आरोपीने त्याचे सोबत अनैसर्गिक संभोग केला. त्यानंतर मारेकऱ्याने मृतकाच्या पुन्हा डोक्यावर दगडाने व शरीरावर फुटलेल्या काचेच्या शिशीने मारुन जिवे ठार केले. पो.स्टे.मोर्शी व स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने त्वरीत तपासात गती देण्याकरिता परीसरातील सिसिटिव्ही फुटेजची पाहणी केली. यामध्ये घटनेपूर्वी मृतक हा एका अनोळखी व्यक्तीबरोबर मोर्शी, अमरावती मार्गाने पायी जात असल्याचे दिसून आले. सदर इसमाचा परीसरात व आजुबाजूने गावात शोध घेतला असता नमुद मारेकरी हा दिनेश उर्फ मोलु उईके येथील असल्याचे निष्पन्न झाले. आरोपीने या हत्येची कबूली दिली. आरोपीला मोर्शी पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले.

# गोवंश तस्करी करणाऱ्या वाहनाची गोरक्षकांकडून तोडफोड

**तीन गोवंशांचा मृत्यू, 11 गोवंश सुखरूप**

**महामार्गावरील वाहतूक तासभर ठप्प**





**महासागर प्रतिनिधी**

**नांदगाव पेठ,( दि.24 )**- राष्टीय महामार्गावरून गोवंश तस्करी ही नित्याचीच बाब झाली आहे. दररोज शेकडो वाहनांमधून खुलेआम गोवंश तस्करी करण्यात येते शुक्रवारी सुद्धा एका वाहनातून अवैधरित्या गोवंश कोंबून कत्तलखान्यात जात असतांना परिसरातील गोरक्षकांनी त्या वाहनाला पकडले मात्र वाहनामध्ये तीन गोवंशांचा गुदमरून मृत्यू झाल्याने संताप अनावर झालेल्या गोरक्षकांनी त्या वाहनाची तोडफोड केली. ही घटना सकाळी 11 वाजताच्या दरम्यान रहाटगाव येथील पुलाजवळ घडली. घटनेने परिसरात तणावाचे वातावरण निर्माण झाले होते तर महामार्गावरील वाहतूक सुद्धा काही वेळ ठप्प झाली होती.

नांदगाव पेठ मार्गावरून अमरावती कडे पीक अप वाहन क्र. एम एच 29,बी ई 0541 मधून गोवंश कत्तलखान्यात जात असल्याची गुप्त माहिती परिसरातील गोरक्षकांना मिळताच त्यांनी सकाळपासून रहाटगाव येथील पुलाजवळ दबा धरून ठेवला. सकाळी 11 वाजताच्या दरम्यान सदर वाहन रहाटगाव जवळ येताच पाच ते सहा गोरक्षकांनी त्या वाहनाला अडविले.गोरक्षकांनी वाहनाची तपासणी केली असता त्यामध्ये 14 गोवंश आढळले.सर्व गोवंशाचे हातपाय आणि तोंड दोरीने बांधलेले होते मात्र यामध्ये तीन गोवंशांचा गुदमरून मृत्यू झाल्याने गोरक्षकांचा संताप अनावर झाला आणि त्यांनी त्या वाहनाची तोडफोड सुरू केली. यामधील चालक याने गोरक्षकांचे रौद्ररूप बघून वाहनातून पळ काढला.

दरम्यान घटनेची माहिती नांदगाव पेठ पोलिसांना मिळताच पोलीस निरीक्षक महेंद्र अंभोरे यांनी घटनेचे गांभीर्य लक्षात घेता तातडीने मुख्यालयातील अतिरिक्त ताफा, क्यूआरटी, आरसीपी पथकांना घटनास्थळी पाचारण केले. राष्ट्रीय महामार्गावरील वाहतूक जवळपास एक तास ठप्प झाली होती. पोलिसांनी शर्थीचे प्रयत्न करून गोरक्षकांचा राग शांत केला आणि वाहतुक सुरळित करून परिस्थिती पूर्ववत केली. त्यानंतर पोलिसांनी सदर वाहन जप्त करून नांदगावपेठ पोलिस ठाण्याच्या आवारात लावले. अन्य वाहनाने 11 गोवशांना नांदगावपेठ येथील गोशाळेत दाखल करण्यात आले. याबाबत पोलीस उपनिरीक्षक प्रदीप शहाणे यांच्या फिर्यादी वरून अज्ञात वाहन चालकाविरुद्ध कलम 5(अ),5(ब),पशुसंरक्षण अधिनियम 1986 सहकलम 11/1 (ड),प्राणी छळ अधिनियम 1960 सहकलम 325,बीएनएस 83/177 मोटार वाहन कायद्याअंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास नांदगाव पेठ पोलीस करत आहे.

# अनियमित पाणीपुरवठ्यामुळे पिंपळोदवासी त्रस्त

## पाणी सोडणाऱ्या कर्मचाऱ्यावर रहिवाशांचा संताप ■ आमरण उपोषणाचा इशारा



**महासागर प्रतिनिधी**


**दर्यापूर,( दि.24 )**- दर्यापूर तालुक्यातील पिंपळोद या गावात मागील दोन वर्षांपासून दहा-बारा दिवसात एकदा आणि तोही अनियमित पाणीपुरवठा केला जात असल्याने गावातील रहिवासी कमालीचे त्रस्त झाले आहेत. या कृत्रिम पाणीटंचाईमुळे गावातील नागरिकांसोबतच पाळीव प्राण्यांचेही हाल होत असून अधून-मधून पाणी विकत घेण्याची वेळही त्यांच्यावर येत आहे. गावात जलवाहिन्यांद्वारे पाणी सोडण्याची जबाबदारी जीवन प्राधिकरणाच्या ज्या कर्मचाऱ्यावर आहे, तो हेतूपुरस्सर हा प्रकार घडवून आणत असल्याचा आरोप ग्रामस्थांकडून करण्यात आला असून त्याच्याविरुद्ध संताप व्यक्त करण्यात येत आहे.

पिंपळोद हे गाव खारपारपट्ट्यात येते. येथील भूगर्भातील पाणी पिण्याच्या योग्य नाही. त्यामुळे शहानुर प्रकल्पातील पाणीपुरवठा योजनेवरच नागरिकांना अवलंबून राहावे लागते. परंतु शहानुर योजनेतून पाणीपुरवठ्यात मोठी अनियमितता आहे. तसेच अनेक ठिकाणी जलवाहिन्या फुटल्याने बाहेरची घाण त्यात शिरत आहे. त्यामुळे ग्रामस्थांना अशुद्ध व गढूळ पाण्याचा पुरवठा होत असल्याने गावातील सार्वजनिक आरोग्यही धोक्यात आले आहे. दहा-बारा दिवसातून गावात एकदा पाणीपुरवठा होतो. एवढ्या दिवसाचे पाणी साठवून ठेवण्याची व्यवस्था लोकांकडे नाही.

त्यामुळे पिंपळोदच्या रहिवाशांना कृत्रिम पाणीटंचाईचा सामना करावा लागत आहे. गावातील रहिवाशांचा प्रमुख व्यवसाय शेती आहे. जोडधंदा म्हणून अनेक लोकांकडे पाळीव जनावरे सुद्धा आहेत. माणसांनाच मुबलक प्रमाणात पाणी मिळत नसताना मुक्या जनावरांची तहान कशी भागवावी असा प्रश्न पशुपालकांसमोर निर्माण झाला आहे. गावात नियमित पाणीपुरवठा करण्यात यावा अशी मागणी अनेक महिन्यांपासून गावकऱ्यांकडून केली जात आहे. जीवन प्राधिकरणाच्या अधिकाऱ्यांना याबाबत अनेकदा निवेदने दिल्या गेली. आंदोलनेही करण्यात आली. परंतु त्याची दखल घेण्यात आली नाही. परिणामी ग्रामस्थांमध्ये जीवन प्राधिकरणाच्या विरोधात प्रचंड रोष निर्माण झाला आहे. आता वरिष्ठ अधिकाऱ्यांनीच लक्ष घालून पिंपळोद गावातील पाण्याची गंभीर समस्या सोडवावी, अन्यथा जीवन प्राधिकरण कार्यालयासमोर आमरण उपोषण करण्याचा इशारा देण्यात आला आहे.

# अमरावतीत बांगलादेशी रोहिंग्यांना दिला जातो आश्रय?

## भाजप खासदार अनिल बोंडे यांचा आरोप



**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती,( दि.24 )**- अमरावतीत बांगलादेशी रोहिंग यांना आश्रय दिला जातो, असा खळबळजनक आरोप भाजपचे खासदार अनिल बोंडे यांनी शुक्रवारी (दि.24)केला आहे. पोलीस आयुक्तांना या संदर्भात पत्र देत कारवाई करण्याची मागणी केली असल्याची माहिती डॉ.बोंडे यांनी दिली आहे. अमरावतीत आश्रयित असलेले बांगलादेशी रोहिंग्या की पश्चिम बंगालचे रहिवासी याबद्दल संभ्रम निर्माण झाला होता. भाजपचे नेते किरीट सोमय्या यांनी बनावट जन्म दाखल्याच प्रकरण बाहेर काढलं. त्यावेळी सर्वजण जागरूक झाले. औद्योगिक वसाहतीत बांगला बोलणारे नागरिक आहेत. त्यामधील अनेक जणांची कागदपत्र ही संशयास्पद आहेत. ते बांगलादेशातून आले असल्याचे आता जाहीर झालं आहे. सैफ अली खान याच्यावर हल्ला करणारा देखील बांगलादेशी आहे. त्यामुळे या बांगलादेशीवर कडक कारवाई करण्याची मोहीम सरकारने हाती घेतली आहे,असे देखील बोंडे यांनी स्पष्ट केले आहे.

### व्यापाऱ्यांनी रोहिंग्यांना आश्रय देवू नये!

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वात पोलिसांनी या प्रकरणात कठोर पाऊल उचलली आहेत. त्यासाठी पोलीस खात्याचं मन:पूर्वक अभिनंदन करतो,असं देखील डॉ.अनिल बोंडे म्हणाले. तर दुसरीकडे औद्योगिक वसाहतीत असलेल्या विविध कारखान्यांमध्ये काम करणाऱ्या व्यापाऱ्यांना त्यांनी आवाहन केले की, कामावर कामगार ठेवताना त्यांची पूर्ण खातर जमा करावी. भारतात राहून हे कुणाच्यातरी जीवावर उठतील. त्यामुळे त्यांना येथून बाहेर हाकलण्याची वेळ आली असल्याचा आक्रमक पवित्रा देखील त्यांनी घेतला.

# यावली शहीदच्या सरपंचपदी शिल्पा खवले

**उपसरपंचपदी नितीन पाचघरे**





**महासागर प्रतिनिधी**

**नांदगाव पेठ, ( दि.24 )** - राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांचे जन्मगाव असलेल्या यावली शहीद या आदर्श गावच्या सरपंचपदी शिल्पा तुषार खवले यांची एकमताने निवड करण्यात आली तर उपसरपंचपदी नितीन पाचघरे यांची निवड करण्यात आली.शुक्रवारी निवडणूक निर्णय अधिकारी एस.आर.जोगी यांच्या उपस्थितीत झालेल्या या निवडप्रक्रियेत 13 पैकी दहा सदस्यांनी भाग घेतला होता. निवडणूक प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर उपस्थितांनी नवनियुक्त सरपंच शिल्पा खवले व उपसरपंच नितीन पाचघरे यांचे स्वागत करून त्यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. याप्रसंगी ग्रामपंचायत सदस्य योगेश निंभोरकर, सुनील देशमुख, स्नेहल यावलीकर, निरंजना मेश्राम, अनिसाबी, करुणा खंडारे, अविनाश वानखडे, वैशाली वानखडे सह ग्रामविकास अधिकारी दिनेश मोहोड उपस्थित होते. यावेळी सामाजिक कार्यकर्ते अजय पाचघरे,प्रकाश वाघमारे, भूषण कांडलकर, नंदा निंभोरकर, अतुल यावलीकर, भूषण खवले, पंकज देशमुख यांनी नवनियुक्त सरपंच उपसरपंच यांचे स्वागत केले.

### विकासावर भर- शिल्पा खवले

यावली शहिद गावाचा शाश्वत विकास करण्यावर आपला भर राहणार आहे. स्वच्छता, वृक्ष लागवड, नागरिकांना तात्काळ सुविधा यांवर आपला भर असणार आहे.आपल्या कार्यकाळात आपण यावली हे गाव अधिक समृद्ध बनविण्यासाठी प्रयत्नशील राहू.

**शिल्पा खवले, नावनियुत सरपंच**

# आता कृषि योजनांच्या लाभासाठी शेतकऱ्यांनाही ओळख क्रमांक

## जिल्ह्यात ॲग्रीस्टॅक योजना राबविण्यास मान्यता ■ सिएससी सेंटरवर ओळख क्रमांक काढण्याची सुविधा




**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती,( दि.24 )**- जिल्ह्यात केंद्र शासनाची 'ॲग्रीस्टॅक' ही योजना राबविण्यास मान्यता देण्यात आली आहे. त्यानुसार शासनाच्या सर्व योजनांचे लाभ आणि सहभाग मिळविण्यासाठी शेतकरी ओळख क्रमांक मिळविणे गरजेचे आहे. त्यामुळे जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी नागरी सुविधा केंद्रातून शेतकरी ओळख क्रमांक काढावा, असे आवाहन जिल्हा प्रशासनाने केले आहे.

ॲग्रीस्टॅकच्या माध्यमातून कृषि क्षेत्रातील डेटा आणि डिजीटल सेवांच्या उपयोगाने शासनाच्या विविध योजना लाभ पात्र शेतकऱ्यांपर्यंत पोहोचण्यात येणार आहे. ॲग्रीस्टॅक अंतर्गत प्रत्येक शेतकऱ्याला शेतकरी ओळख क्रमांक देण्याची सुविधा नागरी सुविधा केंद्रात करण्यात आली आहे. शेतकऱ्यांनी नागरी सुविधा केंद्रात सातबारा, आठ अ आणि आधार क्रमांकाशी संलग्न असलेला मोबाईलसह संपर्क साधणे आवश्यक आहे. नोंदणी करताना आधारशी संलग्न मोबाईल क्रमांकावर ओटीपी येणार आहे. ओटीपी नमूद केल्यानंतरच नोंदणीची प्रक्रिया पूर्ण होणार आहे. नोंदणी झाल्यावर शेतकरी ओळख क्रमांक त्याच मोबाईल क्रमांकावर प्राप्त होणार आहे.

शेतकरी ओळख क्रमांक अत्यंत महत्वाचा असून शेतकऱ्यांनी जपून ठेवणे आवश्यक आहे. भविष्यात शेतकऱ्यांसाठीच्या योजनांचा लाभ शेतकरी ओळख क्रमांकानुसार शेतकऱ्यांच्या थेट बँक खात्यात जमा होणार आहे. भविष्यातील प्रत्येक योजनेमध्ये सहभागी अथवा लाभ मिळविण्याकरीता शेतकरी ओळख क्रमांक आवश्यक असणार आहे.

### तलाठ्यांना संपर्क करण्याचे आवाहन

कृषि क्षेत्राच्या विकासासाठी केंद्र आणि राज्य शासनातर्फे राबविण्यात येणाऱ्या अनेक महत्त्वपूर्ण योजना योग्य व पात्र लाभार्थ्यांपर्यंत जलद गतीने पोहचवून कृषि क्षेत्राचा विकासासाठी ॲग्रीस्टॅक योजना राबविण्यात येणार आहे. त्यामुळे शेतकऱ्यांनी प्राधान्याने शेतकरी ओळख क्रमांक काढावा, अडचण आल्यास गावाच्या तलाठ्यांशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

# काळ आला, पण वेळ नाही!

**थोडक्यात बचावला बालक**

**मांज्याने गळा कापला**



**महासागर प्रतिनिधी**

**हिवरखेड,( दि.24 )** - नायलॉन मांजाने पुन्हा एकदा गळा कापण्याची धक्कादायक घटना समोर आली. तीन वर्षीय बालकाचा काळ मांजाच्या रुपाने आला होता, परंतू दैव बलवत्तर असल्याने वेळ आली नाही.

संत्रा व्यावसायिक कैलाश माकोडे हे त्यांच्या मुलीला शाळेमध्ये सोडून घराकडे येत असताना प्रविण भोजने यांचे गोठ्याजवळ कटलेल्या पतंगाचा मांजा माकोडे यांच्या रितेश नावाच्या तीन वर्षांच्या मुलाच्या गळ्यात अडकला सुदैवाने त्यांच्या वाहनाचा वेग कमी असल्याने तो मांजा गळ्याला खोल जखम करु शकला नाही. या घटनेमूळे मात्र बालकाच्या पायाखालची वाळूच सरकली.

अशीच एक घटना 14 जानेवारी रोजी घडली होती. विक्की रविंद्र काळे हा हिवरखेड येथील युवक आर्वी वरुन हिवरखेडला येत असतांनाच तळेगाव शामजी पंत येथील हायवेवर कटलेल्या पतंगाचा धागा (मांजा) गळ्याला लागला. मात्र दुचाकीचा वेग कमी असल्याने हा युवक थोडक्यात वाचला. पतंग उडविण्याचा छंद निष्पाप लोकांच्या जीवावर बेतत असल्याने पालकांनी आपल्या मुलांना पतंग उडविण्यापासुन परावृत्त करावे असे गावकरी कैलास माकोडे व विक्की काळे यांचे म्हणणे आहे.

आरएनआय ४६९७५/१९८५ महासागर अमरावती


मालक, मुद्रक, प्रकाशक श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी अरूणोदय प्रेस, कॉटन मार्केट, नागपूर १८ येथे छापून दैनिक महासागर कार्यालय, होटल टूरिस्टच्या बाजूला रेल्वे स्टेशन चौक, अमरावती येथे प्रकाशित केले. संपादक -श्रीकृष्ण तनसुखदास चांडक ( पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर राहील ) अमरावती मुख्य कार्यालय, पत्ता. दैनिक महासागर, होटल टूरिस्टच्या बाजूला रेल्वे स्टेशन चौक अमरावती, फोन नं. ९५१८९३४५०४

# 'अचलपूर जिल्हा' मतदारांना दाखविण्याचे दिवास्वप्न !

## बच्चू कडूंच्या राजकारणानंतर आ.प्रविण तायडेंनेही सूर आवरला

**मो.अजहरुद्दीन**

**अचलपूर (दि.24)** – 'अचलपूर जिल्हा' हा शब्दच अचलपूर मतदारसंघातील नागरिकांकरिता 'बिरबल ची खिचडी' ठरला आहे. तब्बल 20 वर्ष माजी आमदार बच्चू कडू यांनी आपल्या राजकारणाचा पाया या दिवास्वप्नावर उभा केला होता. बच्चू कडूंना नागरिकांनी प्रवाहातून बाहेर केल्यावर आता विद्यमान आमदार प्रविण तायडेंकडून नागरिकांना भरपूर अपेक्षा होत्या, मात्र त्यांनी त्यांच्या पहिल्या हिवाळी अधिवेशनात आवरता सूर घेतला 'अचलपूर जिल्हा' तर दूरच त्यांचे ओठ कुठल्याच समस्येवर उघडले नाही. त्यामूळे मतदारसंघातील नागरिकांचा आजी–माजी आमदारांककडून सर्वच टप्प्यांवर भ्रमनिरास झाला असल्याचे दिसत आहे.




सन 2004 मध्ये बच्चू कडू पहिल्यांदा आमदार बनले. तत्पुर्वी त्यांच्या निवडणूकीच्या प्रचारातील जाहिरनाम्यामध्ये 'अचलपूर जिल्हा' हा मतदारांना भुरळ घालणारा मुख्य मुद्दा होता. त्यानंतर बच्चु कडू विधानसभा निवडणूक आली की हा मुद्दा बाहेर काढून मतदारसंघातील नागरिकांना दिवास्वप्ना मध्ये गुंतवून ठेवायचे. 'अचलपूर जिल्हा' ही मागणीच अशक्यप्राय असल्याचे समजल्यानंतर बच्चू कडूंनी हळूहळू हा मुद्दा आपल्या चर्चेतून काढून टाकला. मात्र मतदारसंघातील नागरिकांच्या डोक्यातून हा मुद्दा गेला नाही. नागरिक, सामाजिक कार्यकर्ते आणि विविध संघटनांनी वेळोवेळी या मागणीसाठी आवाज उठविला. यापूर्वी महाराष्ट्राचे माजी गृहमंत्री आर.आर.पाटील यांनी अचलपूर जिल्हा जाहीर करण्याचा प्रस्ताव जवळपास सादर केला होता. मात्र, खर्चाचे अचूक मूल्यांकन आणि योजनाबद्ध दृष्टिकोनाची कमतरता यामुळे ही प्रक्रिया अर्धवटच राहिली. अचलपूर जिल्ह्याच्या मागणीसाठी माजी मंत्री वसुधा देशमुख, माजी मंत्री बच्चू कडू यांच्यासह विद्यार्थ्यांनी, युवकांनी आणि विविध सामाजिक संघटनांनी आंदोलनाद्वारे आपली मागणी मांडली. मात्र, राज्य सरकारने ही मागणीही दुर्लक्षित केली. परिणामी, अचलपूर जिल्हा बनविण्याची थंडबस्त्यात आहे.

### आता सत्ताधारी काय दिवे लावतील

बच्चू कडूंकडून दिवास्वप्न दाखवून झाल्यानंतर आता विद्यमान आमदार प्रविण तायडे हे सत्तेतील आमदार आहे. मुख्यमंत्रीच त्यांच्या पक्षाचा आहे, माजी खासदार नवनित राणा, बडनेराचे आमदार रवी राणा त्यांच्या निकटवर्तीय आहेत. त्यामूळेच आपसूकच मुख्यमंर्त्यांपर्यंत त्यांचा वशिला आहे. ते जिल्हा निर्मिती आणि रोजगाराच्या महत्त्वाच्या मुद्द्यांवर केंद्र व राज्य सरकारचे लक्ष वेधतील. असे अपेक्षा स्थानिकांना आहे.

### शकुंलतला, आणि फिनलेही प्रतिक्षेतच

अचलपूर जिल्हा प्रमाणेच बंद पडलेली शकुंतला रेल्वेला ब्रॉडगेज करुन पुन्हा सुरु करणे व बंद पडलेल्या फिनले मीलच्या बाबतीत आवाज उठविणे विद्यमान आमदारांना हिवाळी अधिवेशनात जमले नाही. मात्र भविष्यात तरी ते नागरिकांच्या अपेक्षेवर खरे ठरतील. नाहीतर उघडा गेला आणि नागडा आला, असेच चित्र मतदारसंघातील नागरिकांना पुढचे पाच वर्ष पहायला मिळेल.

# टवलार ग्रा.पं.च्या सचिवावर शिस्तभंगाची कारवाई करा

### युवाशक्ती ग्रामविकास संघटनेची मागणी

### वरिष्ठांच्या आदेशाची पायमल्ली केल्याचा आरोप



**महासागर प्रतिनिधी**

**परतवाडा,(दि.24)** – वरिष्ठांचे आदेश असतानाही अतिक्रमण निर्मूलनाची कारवाई न करता आदेशाची पायमल्ली करून अतिक्रमणाला प्रोत्साहन देणाऱ्या टवलार ग्रामपंचायतचे सचिव अजय देशमुख यांच्यावर शिस्तभंगाची कारवाई करण्यात यावी, अशी मागणी युवाशक्ती ग्रामविकास संघटनेचे संस्थापक अध्यक्ष इम्रान पठाण यांनी केली आहे.

अचलपूर तालुक्यातील टवलार ग्रामपंचायत अंतर्गत शासकीय जमिनीवर अतिक्रमण करण्यात आल्याचे चौकशीत निष्पन्न झाले होते. हे अतिक्रमण हटविण्यात यावे असे आदेश जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी 23 सप्टेंबर 2024 रोजी टवलार ग्रामपंचायतचे सचिव अजय देशमुख यांना दिले होते. अचलपूर पंचायत समितीच्या गटविकास अधिकाऱ्यांनीही सदर अतिक्रमण तात्काळ हटविण्याचे आदेश 16 ऑक्टोबर 2024 रोजी पत्रातून दिले होते. मात्र टवलार ग्रामपंचायतच्या ग्रामसेवक व अधिकारी यांनी तीन महिन्यांचा कालावधी उलटून गेल्यानंतरही अतिक्रमण काढण्याची कारवाई केली नाही. त्यामुळे वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या आदेशाची पायमल्ली झाली असून कर्तव्यातही संबंधित अधिकाऱ्यांनी हयगय केली आहे.

त्यामुळे ग्रामसेवक अजय अंबादास देशमुख यांच्यावर महाराष्ट्र जिल्हा परिषद सेवा नियमानुसार शिस्तभंगाची कारवाई करण्यात यावी, अशी मागणी इमरान पठाण यांनी केली आहे. एका पत्रकार परिषदेत त्यांनी याबाबत माहिती दिली. यावेळी प्रमोद घाटे, पवन पाटणकर, स्वप्निल चव्हाण, देवेंद्र भोंडे, निलेश गजभिये, सुधीर तायडे, रामेश्वर सुलताने आदी उपस्थित होते.

# हिवरखेडच्या रवीना नागलेचे एमपीएससी परीक्षेत यश

## अन्नसुरक्षा अधिकारी पदासाठी निवड

**महासागर प्रतिनिधी**

**हिवरखेड,(दि.24)** – येथील एका सर्वसामान्य गरीब कुटुंबातील सदस्य असलेल्या कु. रवीना बबन नागले हिने महाराष्ट्र लोकसेवा आयोग अर्थात एमपीएससीच्या परीक्षेत नेत्रदीपक यश संपादन केले आहे. तिची अन्न व औषधी प्रशासनाच्या अन्नसुरक्षा अधिकारी या राजपत्रित वर्ग दोन पदासाठी निवड झाली आहे.



रवीना नागले हिने आपले प्राथमिक शिक्षण हिवरखेडच्या जिल्हा परिषद शाळेतून पूर्ण केले. त्यानंतर परिस्थितीमुळे ती पुढील शिक्षणासाठी अहमदनगर येथे तिचे काका सुखदेव नागले यांच्याकडे गेली. पुणे येथून कृषी अभ्यासक्रमात तिने बीएससीची पदवी प्राप्त केली. सध्या ती राहुरीच्या महात्मा फुले कृषी विद्यापीठात पदव्युत्तर शिक्षण घेत आहे. याच दरम्यान तिने एमपीएससी परीक्षेची तयारी चालविली होती व त्यात यश संपादनही केले. तिने आपल्या यशाची श्रेय आई–वडील आणि कुटुंबीयांना दिले आहे. या यशाबद्दल रवीनाचे गावात सर्वत्र कौतुक होत आहे.

# दंतमहाविद्यालयात विश्व कृत्रिम दंतशास्त्र दिवस साजरा

### आठवडाभर विविध उपक्रमांचे आयोजन



**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, (दि.24)** – विदर्भ युथ वेल्फेअर सोसायटी द्वारा संचालित दंत महाविद्यालय व रुग्णालयाच्या वतीने विश्व कृत्रिम दंतशास्त्र दिवस साजरा करण्यात आला. त्यानिमित्त आठवडाभर विविध उपक्रम व कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. या उत्सवाचा प्रारंभ कॅम्प परिसरातील राष्ट्रमाता जिजाऊ यांच्या स्मारकाला अभिवादन करून झाला.

या उत्सवांतर्गत वयोवृद्ध रुग्णांकरिता मोफत चिकित्सा विभागाच्या नूतनीकरणाच्या कामाचे उद्घाटन दंत महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ. राजेश गोंधळेकर आणि भारतीय कृत्रिम दंतशास्त्र संघटनेच्या अध्यक्ष डॉ. अपर्णा बारब्दे यांच्या हस्ते करण्यात आले. महाविद्यालयात विद्यार्थ्यांसाठी विविध क्षेत्रातील तज्ञांचे व्याख्यान व मार्गदर्शनपर कार्यक्रमही आयोजित करण्यात आले. प्रा. डॉ. कृष्णकुमार लाहोटी यांनी वयोवृद्ध पूर्णमुख पुनर्वसन या विषयावर आपले विचार व्यक्त केले. विविध स्पर्धांचे महाविद्यालयातील विद्यार्थ्यांसाठी आयोजन करण्यात आले होते.

मोफत कृत्रिम कवळी शिबिरातून गरजू रुग्णांना मोफत सेवा देण्यात आली. पथनाट्याच्या माध्यमातून शहरात ठिकठिकाणी दंत उपचारासंदर्भात समाजात जनजागृतीही करण्यात आली. महाविद्यालय परिसरात वृक्षारोपण करून पर्यावरण संरक्षणाचा संदेश विद्यार्थ्यांनी दिला.

विश्व कृत्रिम दंतशास्त्र दिवस उत्सव यशस्वीरित्या साजरा करण्यासाठी इंडियन प्रॉस्टो डोन्ट टिक सोसायटीच्या अध्यक्षा प्रा. डॉ. अपर्णा बारब्दे, डॉ. ब्रजेश दमानी, डॉ. भाग्यश्री चिमोटे, डॉ. भूषण वानखडे, डॉ. राहुल अडवाणी, डॉ. श्रद्धा अंबाडकर, डॉ. कोमल वर्धने, डॉ. सोनाली शंभरकर, डॉ. समीक्षा अजमीरे, वैशाली साबळे, जितेंद्र गायकवाड, सुमित राठोड, सय्यद हाफिजुद्दीन, राजेश ताजने, मराठा सेवा संघाचे जिल्हा सचिव संजय ठाकरे यांचे सहकार्य लाभले. अभियानाच्या यशस्वीतेसाठी डॉ. नीलिमा, डॉ. सिद्धी, डॉ. लक्ष, डॉ. रेवती, डॉ. प्रसाद, डॉ. शितल यांनी परिश्रम घेतले.

# बेनोडा (शहीद) जि.प.शाळेमध्ये वार्षिक स्नेहसंमेलन



**महासागर प्रतिनिधी**

**वरुड,(दि.24)** – जिल्हा परिषद प्राथमिक शाळा बेनोडा शहीद येथे नुकतेच वार्षिक स्नेहसंमेलनाचे आयोजन करण्यात आले होते. सांस्कृतिक कार्यक्रमाचे उद्घाटक पंचायत समितीचे गटशिक्षणाधिकारी विनोद गाडे यांच्या हस्ते करण्यात आले, तर या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून बेनोड्याच्या सरपंच रजनी कुबडे, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष सुनील पुंड, उपसरपंच उत्तम पोटोडे, शिक्षक विस्तार अधिकारी दिलीप बुरंगे, तालुका समन्वयक चंदन आडे, विशाल यावले, गोपाल नांदूरकर, केंद्रप्रमुख स्नेहा राऊत, चंचल बोंडे, वैशाली भलावी, विलास महाजन, मीना फुसेसह आदी मान्यवर उपस्थित होते.

यावेळी शिक्षणाधिकारी विनोद गाढे यांनी विद्यार्थ्यांना मोलाचे मार्गदर्शन केले. सांस्कृतिक कार्यक्रमांमध्ये माजी केंद्रप्रमुख धनराज इंगळे, खुशाल सातपुते यांचा शाळेतर्फे सत्कार करण्यात आला, तसेच विविध स्पर्धांमध्ये सहभागी विजयी स्पर्धकांना व विजयी महिला पालकांना बक्षीस वितरण करण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मंजुश्री निकम व रोशनी घोगरे यांनी केले. सदर वार्षिक स्नेहसंमेलनाच्या यशस्वीतेसाठी शाळेतील शिक्षिका शालिनी बिजवे, रेखा हूड, अश्विनी वाडेकर, रेखा मानकर, कल्पना ठाकरे, अविनाश पुसदेकर, मंजुश्री निकम, राज पापडकर या सर्वांनी अथक परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन कु. रोशनी घोगरे यांनी केले.

**विविध खेळाचे आयोजन**

स्नेहसंमेलनानिमित्य 20 व 21 जानेवारी रोजी विद्यार्थ्यांच्या विविध खेळ स्पर्धा घेण्यात आल्या. विजयी विद्यार्थ्यांचे क्रमांक काढून त्यांना बक्षीस देण्याचे आली. 22 जानेवारीला पाककृती स्पर्धा, पुष्प रचना स्पर्धा, रांगोळी स्पर्धा घेण्यात आल्या. या स्पर्धांमध्ये बहुतांश महिला पालकांनी आपला सहभाग नोंदवला. या स्पर्धेचे सरपंच रजनी कुबडे, केंद्रप्रमुख स्नेहा राऊत, मुख्याध्यापिका मीना फुसे, अंगणवाडी पर्यवेक्षिका चंचल बेंडे या सर्वांनी निरीक्षण करून क्रमांक दिलेत. विजयी महिला पालकांना बक्षीस देण्याचे तसेच सहभागी महिला पालकांना सुद्धा प्रोत्साहन पर बक्षीस देण्यात आले. 23 जानेवारीला सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

# भार्गव वानखडे ची दिल्ली येथे एनसीसी परेड साठी निवड

**महासागर प्रतिनिधी**

**मोर्शी,(दि.24)** – विद्याभारती महाविद्यालय अमरावती येथील विद्यार्थी भार्गव वानखडे याची गणराज्य दिनाच्या एनसीसी परेडसाठी दिल्ली येथे निवड केलेली आहे.माळीपुरा मोर्शी येथील भार्गव राजेंद्र वानखडे याची एनसीसी परेड साठी भारतीय गणराज्य दिनाच्या 75 व्या वर्धापन दिनाचे दिल्ली येथे होणाऱ्या कार्यक्रमासाठी निवड झाली आहे.

तो विद्याभारती महाविद्यालय अमरावती येथे बीसीए चे शिक्षण घेत आहे. त्याची एनसीसीच्या तीन महाराष्ट्र बटालियन कॅडेड मध्ये निवड करण्यात आली आहे. एनसीसीच्या परेडमध्ये तो महाराष्ट्राचे नेतृत्व करणार असल्यामुळे त्याचे सर्वत्र अभिनंदन होत आहे.



# मुलीला टॉन्टींग करणे पडले महागात

**अमरावती** – नागपुरी गेट पोलिस ठाण्याच्या हद्दीतील एका तरुणीचा पाठलाग करून तिला टॉन्टींग करणे एका तरुणाला चांगलेच महागात पडले.

पिडित मुलीच्या तक्रारीवरून नागपुरी गेट पोलिसांनी 23 जानेवारी रोजी आरोपी असलम खान पठाण, अयान खान पठाण मोहम्मद अय्यान मोहम्मद शरिफ (दोन्ही रा. यास्मीननगर) यांच्याविरुध्द गुन्हा नोंदविला आहे.

# जनस्वराज्य बहुउद्देशीय संस्थेत विविध खेळ स्पर्धेचे आयोजन



**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती,(दि.24)** – जनस्वराज्य बहुउद्देशीय संस्था व नेहरू युवा केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने नांदगाव खंडेश्वर येथे विविध खेळ स्पर्धेचे नुकतेच आयोजन करण्यात आले होते. जनस्वराज्य बहुउद्देशीय संस्था अध्यक्ष भूपेंद्र जेवडे, नेहरू युवा केंद्र जिल्हा समन्वयक स्नेहल बासुतकर, स्वराज्य प्रशासकीय अकादमीचे राहुल हजारे, प्रतीक कोल्हे, गजानन शेळके, दर्शन मारोटकर उपस्थित होते.

खेळाला आपल्या जीवनात महत्त्वाचे स्थान आहे. जीवनात व्यथा आणि चिंता विसरायला लावण्याचे सामर्थ्य खेळामध्ये आहे. मनाला विरंगुळा देणे आणि मन ताजेतवाने करण्याचे काम खेळ करतात. ज्या खेळात भरपूर श्रम किंवा शारीरिक हालचाली कराव्या लागतात त्या खेळांमुळे खेळाडूंचा व्यायाम होतो. शरीर काटक व बळकट बनवण्यास खेळ मदत करतात. खेळांमुळे मनोधैर्य, चिकाटी, खिलाडूपणा इत्यादी गुणांची वाढ होते. सांघिक खेळ खेळल्यामुळे सहकार्य, संघभावना वाढीस लागते आणि नेतृत्वगुणांचा विकास होतो, असे प्रतिपादन श्री. जेवडे यांनी यावेळी केले. कबड्डी, खो–खो, 100 मीटर धावणे स्पर्धा, गोला फेक, खो–खो अशा विविध स्पर्धा घेण्यात आल्या. विजेता संघाला प्रथम क्रमांक व द्वितीय क्रमांक तसेच वैयक्तिकता खेळाडूंना प्रथम क्रमांक, द्वितीय क्रमांक पारितोषिक म्हणून नेहरू युवा केंद्र, माय भारत ,अमरावती, युवा कार्यक्रम विभाग, युवा कार्यक्रम एवं खेळ मंत्रालय, भारत सरकार यांच्या मार्फत शिल्ड देण्यात आले. या खेळासाठी नांदगाव तालुक्यातील विविध मंडळांनी व खेळाडूंनी सहभाग नोंदविला.

# कलर्स चॅनेलच्या डोरी सीजनमध्ये झळकेल बेनोड्याची 11 महिन्याची अनुश्री

### आई, वडिलांचे स्वप्न पूर्ण

**महासागर प्रतिनिधी**

**वरुड,(दि.24)** – आपल्या गोंडस अश्या बाळाला सिरीयलमध्ये रोल मिळावा हे स्वप्न उरी बाळगून प्रयत्नशील राहणाऱ्या राऊत दाम्पत्याचे परिश्रम फलीत झाले. त्यांच्या 11 महिन्याच्या अनुश्री ला सुप्रसिद्ध कलर्स हिंदी चॅनेलच्या डोरी सीजन 2 मध्ये लहान बाळाचा रोल करण्याची संधी मिळाली. तालुक्यातील बेनोडा शहीद या छोट्याशा गावातील 11 महिन्याची मुलगी अनुश्री मंगेश राऊत हिच्यामूळे बेनोडा शहीद चे नाव देश पातळीवर गेल्याने गावकऱ्यांनी अनुश्रीचे अभिनंदन केले आहे.

12 जानेवारीला मंगेश ला त्यांच्या मित्राचा एक फोन आला की तू मुंबईला मुलीला घेऊन डोरी सीझनच्या ऑडिशनसाठी ये. मंगेश त्याच दिवशी पत्नी प्रिया व मुलीला घेऊन मुंबईला जाण्याकरिता



निघाला व मित्र राकेश गायकवाड याच्या घरी मुक्काम केला. दि. 13 जानेवारीला अनुश्री उर्फ लक्ष्मीप्रियाचे ऑडीशन झाले. गोरेगाव फिल्म सिटीमधे काही कारणास्तव अनुश्री रिजेक्ट झाली. नतर तिच्या आई वडिलांनी नाराज होऊन गावाला जायचे ठरवले. अनुश्रीचे कुटुंब मुंबई चेबूरच्या ट्रॅव्हल्स स्थानकावर अमरावती जाणारी संजय ट्रव्हल्सची वाट बघत थाबले. ट्रॅव्हल्सचा वेळ सायकाळ 4.50 चा होता पण गाडी 40 मिनीटे उशिरा आली. राऊत कुटुंब ट्रव्हल्समधे बसताच त्याच क्षणी शर्मांचा फोन आला कि, 'आपको गोरेगाव फिल्म सिटिके डोरी सीजन 2 के स्टुडिओ सेट पे बुलाया है, आप जल्दी आओ. अनुश्री का शुट है'. अनुश्रीच्या आई बाबाचा आनंद गगणात मावेनासा झाला व तेथून टॅक्सी बुक करून गोरेगाव फिल्म सिटीमध्ये पोहोचले. तेथील निर्देशक निर्माता यांनी अनुश्रीला एक व्हिआयपी रुम दिली त्या ठिकाणी एक केअर टेक व मेकअप पर्सन दिल्या गेले व लगेचच अनुश्रीला शुटिंगला नेण्यात आले. अनुश्री पहिल्याच शुटमधे हिंदी कलर्स चॅनलला पसंत पडली व अनुश्रीच्या पालकांना बोलावून अनुश्रीचे 1 महिण्याचे अग्रीमेंट केले. डोरी सीजन ही सीरिअल कलर्स हिंदी चॅनलवर सोमवार ते शुक्रवार रोज रात्री ठिक 10.30 वाजता आपल्याला पहायला मिळेल.

### चार लाखांच्या सोन्याच्या पाटल्या लांबविल्या

**अमरावती** – फ्रेजरपुरा पोलिस ठाण्याच्या हद्दीतील किशोरनगरातील एका घरातून चोराने चार लाख रुपये किमंतीच्या सोन्याच्या पाटल्या चोरून नेल्या. या घटनेची तक्रार महिलेने 23 जानेवारी रोजी फ्रेजरपुरा पोलिस ठाण्यात दिली. त्यानुसार पोलिसांनी अज्ञाताविरुध्द गुन्हा नोंदविला आहे.

# आर. सी. हायस्कूलमध्ये उत्साहात पार पडले स्नेहसंमेलन

### उद्घाटन सोहळ्याला मान्यवरांची उपस्थिती



**महासागर प्रतिनिधी**

**मोर्शी, (दि.24)**– तालुक्याअंतर्गत लोणी येथील श्रीमती रामप्यारीबाई चांडक विद्यालयात वार्षिक स्नेहसंमेलन सोहळा मोठ्या उत्साहात पार पडला. या स्नेहसंमेलनाचे उद्घाटन शिक्षक आमदार किरण सरनाईक यांच्या हस्ते झाले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी लोणी शिक्षण प्रसारक मंडळाचे तदर्थ समितीचे अध्यक्ष शशिकांत कुबडे हे होते.

दीपप्रज्वलनाने स्नेहसंमेलनाचा शुभारंभ झाला. यावेळी शिक्षक आमदार किरण सरनाईक यांचा सन्मानपत्र, शाल व श्रीफळ देऊन गौरव करण्यात आला. स्व. भागीरथीबाई डोमाजी खोडे यांच्या स्मृती प्रित्यर्थ उभारण्यात आलेल्या प्रवेशद्वाराचे उद्घाटन आ. सरनाईक यांच्या हस्ते झाले. स्व. मारुतराव अमृतराव ढोले स्मृती रंगपंचाचे उद्घाटनही यावेळी सरनाईक यांच्या हस्ते करण्यात आले. शाळा व संस्थेच्या विकासासाठी योगदान देणाऱ्या व्यक्तींचा भावपूर्ण सत्कार करण्यात आला. त्यामध्ये शिक्षण विभागाचे सेवानिवृत्त विस्तार अधिकारी धनराज इंगळे, प्रवेशद्वाराचे बांधकाम करणारे शाळेतील शिक्षक दीपक पांडुरंग खोडे, रंगमंचाचे बांधकाम करणारे सेवानिवृत्त मुख्याध्यापक सुधीर ढोले यांच्यासह सहाय्यक शिक्षक एन. जे. फुसे व डी. एस.सातंगे यांचा समावेश होता. यावेळी %अपेक्षा% या हस्तलिखिताचे विमोचन आमदार किरण सरनाईक यांच्या हस्ते झाले. राज्यस्तरीय स्केटिंगमध्ये यश संपादन करणारा वाद्यार्थी चैतन्य लोखंडे, तसेच सीएची परीक्षा उत्तीर्ण करणारी भाग्यश्री अरविंद पाटील, एनएमएमएस परीक्षेत जिल्ह्यातून दुसरी आलेली कु. एकता संदीप तिखे, दहावीच्या परीक्षेत लोणी केंद्रातून प्रथम आलेली कु. श्रावणी आशिष मेनकुदळे या गुणवंत विद्यार्थ्यांचा यावेळी प्रमाणपत्र व चषक देऊन सन्मान करण्यात आला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक मुख्याध्यापक एस. व्ही. खोडे यांनी केले. यावेळी सरपंच अश्विनी दवंडे, उपसरपंच रविकांत तिखे, शिक्षण विस्तार अधिकारी दिलीप बुरंगे, शालेय पोषण आहार समितीचे अध्यक्ष अनिल चहांदे, रमेश बोरकर, प्रा. शितल देशमुख, प्रा. मडके, पखाले सर, सुरेंद्र ठाकरे, बहुरूपी सर, मानकर सर, बी.बी.लोखंडे, डी. बी. मालपे, कृष्णराव ढोले आदि उपस्थित होते.

# खुल्या वाहनातून राखेच्या वाहतुकीमुळे नागरिक त्रस्त

## आरोग्यासाठी धोकादायक ठरतोय प्रकार ■ कारवाई करण्याची नागरिकांची मागणी

**महासागर प्रतिनिधी**

**दर्यापूर,(दि.24)** – दर्यापूर शहरात मोठ्या अवजड वाहनातून होत असलेली राखेची वाहतूक सर्वसामान्य जनतेसाठी धोकादायक ठरत आहे. या खुल्या वाहनांतून वाहुन नेली जाणारी राख सर्वत्र उडत असल्याने वाहनचालक त्रस्त झाले आहेतच, सोबतच या प्रकारामुळे आरोग्यालाही धोका निर्माण झाला आहे. भरधाव वाहनांतून उडालेली राख थेट डोळ्यात जात असल्याने डोळ्यासमंधीचे विकार सोबतच श्वसन, फुफ्फुसांचे तसेच त्वचेचे आजारही बळावले आहेत. ट्रक मधून राख उडत असताना अन्य वाहन चालकांना वाहन चालविणे ही कठीण होऊन बसते. अशात अपघातांची शक्यताही नाकारता येत नाही. राखेची वाहतूक करणारी ही वाहने शहरातून भरधाव वेगात पळविली जातात. या वाहनांमुळे शहरात हवेची गुणवत्ता ही घसरली असून प्रदूषणाची मोठी समस्या निर्माण झाली आहे. हा धोकादायक प्रकार थांबविण्यासाठी पोलीस प्रशासनाने पुढाकार घेऊन खुल्या वाहनातून राखेची वाहतूक करणाऱ्यांविरुद्ध कठोर कारवाई करण्याची मागणी नागरिकांमधून करण्यात येत आहे.

